**वाचले :** १ मे. जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापूर यांनी दिनांक १८ ऑक्टोबर, २०२४ इ. रोजी प्रसिध्द् केलेली लघुलेखक श्रेणी—३ संवर्गातील उमेदवार यांची निवड/प्रतिक्षा यादी.

२ मे. जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापूर यांचेकडील आदेश क्रमांक प्रशासन ३६/३३५, दिनांक ०३ जुलै, २०२५ अन्वये लघुलेखक श्रेणी —३ वरील उमेदवार श्रीमती श्रृतिका तानाजी कुराडे हया त्यांच्या नेमणूकीचे ठिकाणी लघुलेखक श्रेणी—३ पदावर दिलेल्या मुदतीत रुजू न झालेमुळे निवड यादीमधून त्यांचे नांव वगळयात आलेबाबतचा आदेश.

३ प्रभारी प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापूर यांचा दिनांक ०३ जुलै, २०२५ इ. रोजीचा कार्यालयीन अहवाल व त्यावरील निम्नस्वाक्षरीत यांचा आदेश.

## आदेश क्रमांक प्रशासन ३६/३३६

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, कोल्हापूर हे वर नमुद संदर्भ क्रमांक '१' नुसार लघुलेखक श्रेणी—३ पदी निवड झालेले उमेदवार यांचे प्रथम नेमणुकीसंदर्भात खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहेत :—

| अनुक्रमांक | लघुलेखक श्रेणी—३ प्रतिक्षा यादीमधील क्रमांक | उमेदवारांचे नाव व पत्ता | नेमणुकीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | १ | **तेजस्विनी राजेंद्र करजगार,** ४/८९, विठ्ठल मंदिर जवळ, गुजरी कॉर्नर, गावभाग, इचलकरंजी, जिल्हा कोल्हापूर. ४१६ ११५ | दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, कोल्हापूर येथे रिक्त स्थानी. |

वर नमुद उमेदवार यांची नेमणूक संबधीत पदावर तात्पुरते / तदर्थ स्वरुपात करणेत येत आहे. वर नमुद संदर्भ क्रमांक '१' नुसार उपरोक्त उमेदवार यांनी संबधीत न्यायालयात हजर झालेपासून एक वर्षाचे आत इंग्रजी व मराठी श्रृतलेखन (Shorthand) परीक्षा मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी खुला संवर्गातील उमेदवारांकरीता ३५ टक्के व राखीव सवंर्गातील उमेदवारांकरीता ३० टक्के गुण ठरवून दिलेल्या निकषांनुसार उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे.

...२/—

वर नमुद उमेदवार यांनी त्यांची नेमणूक तदर्थ स्वरुपातील असलेबाबत यासोबत जोडणेत आलेले विहीत नमुन्यातील बंधपत्र भरुन कार्यालय प्रमुख यांचेमार्फत या कार्यालयाकडे तात्काळा पाठवून देणेचे आहे.

वर नमुद उमेदवार यांनी यासोबत जोडणेत आलेला विहीत साक्षांकन नमुना भरुन कार्यालय प्रमुख यांचेमार्फत या कार्यालयाकडे तात्काळ पाठवून देणेचा आहे. उपरोक्त नमुन्यामध्ये उमेदवार यांनी आधार ओळखपत्र क्रमांक, पॅन कार्ड क्रमांक तसेच उमेदवारांच्या कुटुंबातील सदस्य परदेशात अध्ययन करीत असल्यास अथवा राहत असलेस त्याबाबतची माहिती समाविष्ट करणे अनिवार्य राहील.

उपरोक्त उमेदवार यांची वेतननिश्चिती वेतनस्तर एस—१४, वेतनसंरचना ३८६००—१२२८०० या सुधारीत वेतन संरचनेत रुपये ३८,६००/— या मुळ वेतनावर निश्चित करणेत येत आहे.

**उपरोक्त उमेदवार यांनी दिनांक ०४ जुलै, २०२५ इ. रोजी अगर तेथून पुढे ०४ दिवसांत (सुट्टीचे दिवस वगळून) त्यांचे नेमणुकीचे ठिकाणी संबधीत न्यायालयात हजर राहावे अन्यथा त्यांची नेमणुक तदर्थ स्वरुपाची असलेने ती आपोआप रद्द होईल आणि लघुलेखक श्रेणी—३ पदाचे प्रतिक्षा यादीमधून त्यांचे नाव कमी करणेत येईल याची नोंद घ्यावी.**

उपरोक्त उमेदवार यांना कामावर रुजू झालेनंतर सदर कार्यालयीन अटी व शर्तींचे पालन करण्याबाबतचे हमीपत्र व एकनिष्ठतेचे शपथपत्र द्यावे लागेल. तसेच त्यांना वैदयकीय तपासणीसाठी पाठविण्यात येईल व वैद्यकीयदृष्टया पात्र असल्याबाबतचे प्रमाणपत्र अनिवार्य असेल. जर सेवेचा राजीनामा द्यावयाचा असेल तर या कार्यालयास १ महिन्याची आगाऊ लेखी सुचना दिली पाहिजे, किंवा तसे न करता राजीनामा दिलेस १ महिन्याच्या लेखी सुचनेऐवजी १ महिन्याचे वेतना इतके रोख रक्कम (वेतन संरचनेतील (Matrix) वेतन) या कार्यालयात जमा केली पाहिजे.

उमेदवारांनी नेमणूकीच्या ठिकाणी हजर होताना त्यांचा स्वत:चा मुळ फोटो असलेले ओळखपत्र (पॅन कार्ड, ड्रायव्हींग लायसेन्स, आधार कार्ड इ. यापैकी एक) यासह उपस्थित रहावे.

...३/—

महाराष्ट्र शासन निर्णय क्र. अंनियो १००५/१२६/ सेवा—४, मंत्रालय, मुंबई ४०००३२, दिनांक ३१ ऑक्टोबर, २००५ आणि शासन निर्णय क्रमांक अंनियो १००७/१८/सेवा—४, दिनांक ०७ जुलै, २००७ नुसार असे सुचित करणेत येते की, "१ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर त्यांची शासकीय सेवेत नियुक्ती होताच त्यांना नवीन परिभाषिक अंशदान निवृत्तीवेतन योजना लागु ठरेल मात्र सद्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना (म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४) आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागु होणार नाही."

| | | |
|---|---|---|
| जिल्हा व सत्र न्यायालय, | {} | ( कविता बि. अग्रवाल ) |
| कोल्हापूर — ४१६ ००६. | {} | प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, |
| दिनांक : ०३ जुलै, २०२५. | {} | कोल्हापूर. |

**प्रत माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर :—**

१ मा. दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, कोल्हापूर.

२ अधीक्षक ( वित्त / प्रशासन ), जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापूर.

**प्रत माहितीकरीता व पुढील कार्यवाहीकरीता ईमेलव्दारे रवाना :—**

१ तेजस्विनी राजेंद्र करजगार, राहणार ४/८९, विठ्ठल मंदिर जवळ, गुजरी कॉर्नर, गावभाग, इचलकंरजी, जिल्हा कोल्हापूर. ४१६ ११५
**(teju.karajgar@gmail.com )**

आदेशावरुन,

प्रभारी प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय,
कोल्हापूर.